# बाळासाहेब वाघ यांच्या जयंतीनिमित्त १९ ला कार्यक्रम

## ना. थोरात, ना. भुजबळ, ना. भुसे यांची उपस्थिती

**नाशिक : प्रतिनिधी**

के. के. वाघ शिक्षण संस्था, स्माईल व स्पिनॅच संस्था व बाळासाहेब वाघ वेल्फेअर फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने के. के. वाघ शिक्षण संस्थेचे माजी अध्यक्ष कै. बाळासाहेब (भाऊ) देवराम वाघ यांच्या ९३ व्या जयंतीनिमित्त रविवार, १९ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता के. के. वाघ अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ व महाराष्ट्र राज्याचे शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महाराष्ट्र राज्याचे माजी महसूलमंत्री बाळासाहेब थोरात भूषविणार आहेत.

त्याचप्रमाणे विशेष उपस्थिती म्हणून खासदार राजाभाऊ वाजे, खासदार शोभाताई बच्छाव, खासदार भास्करराव भगरे, माजी खासदार डॉ. प्रतापराव वाघ, माजी खासदार समीर भुजबळ, आमदार डॉ. राहुल आहेर, आमदार दिलीप बनकर, आमदार ॲड. राहुल



ढिकले, आमदार सीमाताई हिरे, आमदार देवयानीताई फरांदे, आमदार सरोजताई अहिरे, आमदार हिरामण खोसकर, आमदार किशोर दराडे, माजी आमदार डॉ. सुधीर तांबे, माजी आमदार अनिल कदम, माजी आमदार नितीन भोसले, मविप्रचे सरचिटणीस ॲड. नितीन ठाकरे, मविप्रच्या माजी सरचिटणीस नीलिमाताई पवार व माजी नगरसेवक गजानन शेलार उपस्थित राहणार आहेत.

ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारेदेखील कार्यक्रमात सहभागी होता येईल. त्यासाठी झूम मीटिंग आयडी- ६१३ ५९६००७५ व पासवर्ड- १२३ असणार आहे.

तरी नाशिककरांनी कार्यक्रमास उपस्थित राहावे, असे संस्थेचे अध्यक्ष समीर बाळासाहेब वाघ व स्माईल व स्पिनॅच संस्थेचे सचिव अजिंक्य बाळासाहेब वाघ यांनी केले आहे.

दै. गांवकरी, दि. 16/10/2025